नि.दि.दा. क्र.३२/२०१८
उकुंडराव वि. शालीकराम
नि.क्र.६१

**वादीतर्फे सा.क्र.३ याचा अधिकचा सरतपास श्री पालीवाल वकील साहेबामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६१ वर दाखल केला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री सायरे वकील साहेबः**

**२.** मी वर्ग ४ पर्यंत शिकलो आहे. माझा जन्म सन १९८४ सालातील आहे. मी आज रोजी पुनारामच्या शेताच्या केसमध्ये साक्ष देण्याकरीता आलो आहे. पुनाराम यास ५ मुले होती. हे म्हणणे खरे आहे की, ही केस पुनारामच्या शेताबाबत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात पुनाराम याचे नाव नमुद नाही ते का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. पुनाराम कोणत्या वर्षात मरण पावला हे मी सांगु शकत नाही. मी पुनारामला पाहीले किंवा नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पुनाराम याने त्याच्या जिवनात कोणते कोणते खरेदीखत करुन दिले हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की वादु उकुंडरावसोबत माझे चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे नाही की काळाफाटा या गावी कोणतीही शेत जमिन नाही. शपथपत्र नमुद असलेले सर्वे नबंरचे मी ७/१२ पाहीले होते. त्याची आराजी मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्याबद्दल मला काही ही माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नही.**

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**
**दिनांकः०२/०७/२०२४**

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**